# Good Work Of Nagpur Rural Police

## नागपुर ग्रामिण पोलीसांची धडक कामगिरी
## दरोडा टाकणाऱ्या आरोपीतांना अटक

दिनांक ०६/०१/२०१७ रोजी पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील ०७ किमी अंतरावरील मौजा चिचाळा शिवार येथे अनोळखी १० ते १५ इसमांनी घटनास्थळावरील डि.एल.एस इंडस्ट्रीज बांबु कंपनी येथून कंपनीतील चौकीदार व २ ट्रक ड्रायव्हर यांना काठीने जबर मारहाण केली. त्या इसमांनी (आरोपीतांनी) सोबत आणलेल्या ट्रकमध्ये कंपनीतील विविध प्रकारचे लोखंडी साहित्य असा एकुण ५६ लाख रुपयाचा मुद्देमाल ट्रक मध्ये भरुन चोरुन नेल्याबाबत फिर्यादी नामे - सिताराम लोकोजी सव्वालाखे, वय ५२ वर्ष, रा. चिचाळा यांचे रिपोर्टवरुन पोस्टे रामटेक येथे अप.क्र. ०९/१७ कलम ३९५, ३९७ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने पोलीस अधिक्षक यांनी समांतर तपासाचे आदेश स्थानिक गुन्हे शाखा व सायबर सेल आणि पोलीस स्टेशन रामटेक यांना दिल्याने त्यांनी घटनास्थळास तात्काळ भेट देवून घटनास्थळावरील माहिती घेतली. त्यानुसार सदर घटनास्थळावरुन तपासी अधिकारी यांनी एक खर्‍याचा कागद जप्त केलेला असून त्यावर रनाळा रोड, कामठी येथील टयुशन क्लासेसचा हा कागद मिळून आल्याने स्थानिक गुन्हे शाखेने कामठी परिसरातील गुप्तबातमीदारांना सक्रिय केले असतांना आज दिनांक १०/०३/२०१७ रोजी सपोनि श्री. उल्हास भुसारी, सपोनि श्री. पुरुषोत्तम अहेरकर, सपोनि श्री. अजबसिंग जारवाल, सपोनि श्री. अरविंद सराफ हे पोलीस स्टाफसह रात्रगस्त करीत असतांना सपोनि श्री. उल्हास भुसारी यांना त्यांचे गुप्त बातमीदारांकडून प्राप्त माहितीच्या अनुषंगाने पोलीस स्टाफ कामठी परिसरात रवाना होवून आरोपी नामे- १) बिट्टु उर्फ भुषण ओंकार तरारे, वय २५ वर्षे, रा. आझादनगर, ड्रॅगनपॅलेस कामठी, २) काका उर्फ सतिश जवाहरलाल पाली, वय ५४ वर्षे, रा. घर नं. एफ २/४२, मच्छीपुल, कामठी, ३) सुरज विकास रंगारी, वय २३ वर्षे, रा. रमाई पुतळा, रमानगर, कामठी, नागपूर, ४) शेख अनवर शेख अमीन, वय २८ वर्षे, रा. अब्दुलशाह दर्ग्याजवळ, कामठी यांना कामठी परिसरातून ताब्यात घेवून

विचारपूस केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच वरील आरोपीतांनी यातील आरोपी क्र. ५) नामे- पप्पु उर्फे दिलीप राजेन्द्र साहु, वय ३१ वर्षे, रा. १६१, अशोक नगर, हनुमान मंदिर शेजारी, कमाल टॉकीज जवळ, नागपूर याला गुन्हयातील चोरलेला माल विकल्याचे सांगीतले, त्यावरुन आरोपी क्र. ५ यास सुध्दा ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच यातील इतर आरोपी नामे- ६) राजुकमार रवी मानकर, वय २१ वर्ष ७) शेख वसीम शेख सलीम, वय २२ वर्ष, ८) अब्बु हुसैन बेग जुम्मन, वय २० वर्ष, ९) आकाश गणेश तिरपाडे, वय २० वर्ष , १०) सुरज शंकर वानखेडे , वय २० वर्ष, ११) गगन नागराज थुल , वय २२ वर्ष सर्व रा. कामठी यांना सुद्धा अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपीतांकडून गुन्हयात वापरलेला ट्रक एम.एच- ४०/एके - ६४१६ व ४ मोबाईल हॅण्डसेट असा एकुण किंमती ९,२९,०००/- रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास रामटेक विभागचे उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री लोहित मथानी, (भा.पो.से) हे करीत आहेत. ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस स्टेशन रामटेक आणि सायबर सेल यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आलेली आहे.

सदरची कार्यवाही ही नागपूर ग्रामीण पोलीस अधिक्षक श्री शैलेश बलकवडे व अपर पोलीस अधिक्षक श्री. नरसिंग शेरखाने यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री संजय पुरंदरे, रामटेकचे ठाणेदार श्री. मनिष ठाकरे, सपोनि श्री. उल्हास भुसारी, श्री. पुरुषोत्तम अहेरकर, श्री. अजबसिंग जारवाल, श्री. अरविंद सराफ व पोलीस स्टाफ श्री. लक्ष्मीप्रसाद दुबे, श्री. शशि शेंडे, श्री. राजेश सनोढिया, श्री. सुरज परमार, श्री. अजय तिवारी, श्री. शैलेश यादव, श्री. सुनिल मिश्रा, श्री. अमोल वाघ, श्री. विशाल चव्हाण, श्री. प्रणय बणाफर, श्री. चेतन राउत, श्रीमती नम्रता बघेल, श्री. साहेबराव बहाळे, श्री.अमोल कुथे, श्री.महेश नुरीया, श्री. उमेश ठाकरे, श्री.निलेश अंबरते, श्री. दिपक यादव, श्री.सुरेश धुर्वे, श्री.संदीप बाजनघाटे, श्री.राजू भोयर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.


Anshu
Aryan


रामटेक पोलीस स्टेशन